स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्वररंग
विद्याविकास
दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१
फॅक्स क्रमांक २५६०११५४

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/९३ दि. १६/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : अंमली पदार्थ विरोधी जनजागृती स्पर्धेमध्ये सहभागी होणेबाबत...**
**संदर्भ : मा. जनसंपर्क अधिकारी, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १५/०६/२०२६ रोजीचे पत्र**

**महोदय,**

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व स्वयंसेवी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने तसेच समर्थ भारत अभियानातंर्गत राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या सहभागातून अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील युवकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी भारत सरकारच्या 'नशामुक्त भारत अभियान' ही संकल्पना मध्यवर्ती ठेवून देशभर अतिशय मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि अंमली पदार्थांना प्रतिबंध या मुद्यांवर व्यापक स्वरूपात उपक्रम राबविण्यात येत आहेत.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, यांच्यापासून ते अगदी शिक्षक, देशप्रेमी नागरिक, साहित्य, कला संस्कृती, पत्रकारिता पोलीस, प्रशासन, चित्रपट सृष्टी अशा विविध क्षेत्रातील मान्यवर हे या उपक्रमात सक्रिय सहभागी होणार आहेत. हा केवळ तात्पुरता कार्यक्रम नसून, पुढील अनेक वर्ष चालणारी ही एक जनजागृती मोहीम समाजात राबवण्यात येणार आहे. या मोहिमेचा अधिकृत शुभारंभ एका राज्यव्यापी स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. सदर स्पर्धांचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

**स्पर्धेचा विषय : अंमली पदार्थाचे दुष्परिणाम आणि त्या विळख्यात सापडलेली तरूणाई**

१. घोषवाक्य(Slogan) स्पर्धा (घोषवाक्य गुगल फॉर्ममध्ये टाईप करून टाकणे)
२. निबंध स्पर्धा (निबंध पीडीएफ करून अपलोड करणे–१०MB)
३. चित्रकला स्पर्धा (पीडीएफ करून अपलोड करणे–१०MB)
४. रील(Reel) निर्मीती स्पर्धा (Instagram ID आणि Reel Link टाकणे)

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदर स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता प्रोत्साहीत करावे. सर्वांसाठी या स्पर्धांमधील सहभाग विनामूल्य असुन, दि. २१ जून २०२६ सहभागी होण्याची अंतिम तारिख आहे. तसेच या स्पर्धेचा भव्य बक्षीस समारंभ शुक्रवार, दि. २६ जून २०२६ 'जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन' या दिवशी संपन्न होणार आहे. तसेच उपक्रमांची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव "अंमली पदार्थ विरोधी दिन २०२६" या विषयाची निवड

करून सादर करण्यात यावी. अहवाल सादर करताना ‘संक्षिप्त अहवाल / अभिप्राय / टिपणी / प्रतिक्रीया’ याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी. तसेच संबधित पोर्टलवर देखील अपलोड करावा.

आपल्या महाविद्यालय मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये “अंमली पदार्थ विरोधी दिन २०२६” याबाबतचा अहवाल **(www.Unipune.ac.in - BOD - BOD online - Login - User Name & Passward - Online Services - Student Development - Menu - gov joint scheme - other joint scheme Add new - योजना निवडा –** (अंमली पदार्थ विरोधी दिन २०२६) येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने तात्काळ भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

आपल्या अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

**स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता गुगल लिंक :** https://forms.gle/TCXTSxEVLjVkwmZe6

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. जनसंपर्क अधिकारी, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र

411

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# पोलीस महानिरीक्षक

## अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे

**मेट्रो प्रशासकीय इमारत, तळमजला, साखर संकुल शेजारी, शिवाजीनगर,पुणे**

---

**प्रेसनोट** दिनांक : १५/०६/२०२६

## अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, (ANTF) महाराष्ट्र राज्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व स्वयंसेवी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी स्पर्धांचे आयोजन

देशभरातील युवकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी भारत सरकारच्या **"नशामुक्त भारत अभियान"** ही संकल्पना मध्यवर्ती ठेवून देशभर अतिशय मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि अमली पदार्थांना प्रतिबंध या मुद्यांवर व्यापक स्वरूपात उपक्रम राबविण्यात येत आहेत. या महत्वकांक्षी संकल्पनेचा एक भाग म्हणून **अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, भोई प्रतिष्ठान - पुणे आणि जाधवर इन्स्टिट्यूट** यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमधील अंमली पदार्थांच्या आकर्षणाला प्रतिबंध करण्यासाठी एक जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, यांच्यापासून ते अगदी शिक्षक, देशप्रेमी नागरिक, साहित्य, कला संस्कृती ,पत्रकारिता पोलीस, प्रशासन, चित्रपट सृष्टी अशा विविध क्षेत्रातील मान्यवर हे या उपक्रमात सक्रिय सहभागी होणार आहेत. हा केवळ तात्पुरता कार्यक्रम नसून, पुढील अनेक वर्ष चालणारी ही एक जनजागृती मोहीम समाजात राबवण्यात येणार आहे. या मोहिमेचा अधिकृत शुभारंभ एका राज्यव्यापी स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात येत आहे, सदर स्पर्धांचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

**अंमली पदार्थाचे दुष्परिणाम आणि त्या विळख्यात सापडलेली तरुणाई या विषयावर**

- घोषवाक्य (Slogan) स्पर्धा
- निबंध स्पर्धा,
- चित्रकला स्पर्धा
- रील (Reels) निर्मीती स्पर्धा

सर्वांसाठी या स्पर्धांमधील सहभाग **विनामूल्य** असुन, सहभागी होण्याचा अंतिम दिनांक 21 जुन 2026 असा आहे. सर्व वयोगटातील विद्यार्थी आणि जागरूक नागरिकांनी या राज्यव्यापी जनजागृतीचे संकल्पनेत मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती ज्योतीप्रिया सिंग, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, ( ANTF) महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी केले आहे.

या स्पर्धेचा भव्य बक्षीस समारंभ शुक्रवार, दिनांक 26 जून 2026 **" जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन "** या दिवशी संपन्न होईल. स्पर्धेच्या सविस्तर अटी, नियम आणि नोंदणीसाठी इच्छुकांनी खाली दिलेल्या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांकडुन कळविण्यात येत आहे.

**Google Link** :- https://forms.gle/TCXTSxEVLjVkwmZe6

**अधिक माहितीसाठी संपर्क** :

श्री अक्षय सरोदे- पोलीस उपनिरीक्षक, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र.- ८३९००६८३७५

प्रा. गणेश भामे (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ - NSS विभाग) - ९५९५०५५०९५

प्रा. सविता कुलकर्णी - ७७२००३७७७४

प्रा. रुचिता अलोने - ७६६६५८२०५

प्रा. वैभव बरकाडे - ९७६४८१०८८५

जनसंपर्क अधिकारी
अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स,म.राज्य,पुणे